| (MHSO200006252014) | <u>नियमित दिवाणी दावा क्र. १६१/२०१४</u> |
|---|---|

## <u>निशाणी क्र. ५५ खालील आदेश</u>

(साऊबाई वाघमोडे विरुध्द राजाराम वाघमोडे)

प्रस्तुतचा अर्ज वादींनी दिवाणी प्रक्रिया संहीता आदेश ६ नियम १७ प्रमाणे दावा दुरूस्ती करण्यास परवानगी मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. वादींचे कथन असे आहे की, सदरहू दाव्याचे कामकाज चालु असताना यातील वादी क्र. १ साऊबाई मच्छींद्र वाघमोडे ही दि. ०९/०२/२०१८ रोजी मयत झालेली आहे. यातील वादी क्र. १ ही मयत झालेबाबत व तिचे दाव्याचेकामी वारस यापूर्वीच अभिलेखावर असल्याची पुरसीस मे. न्यायालयात दिलेली आहे. परंतु, दाव्याच्या सरनाम्यामध्ये वादी क्र. १ हिचे नावासमोर ‘मयत’ असे लिहणे न्यायाचेकामी आवश्यक व गरजेचे आहे. तरी वादी क्र. १ हिचे नावासमोर ‘मयत’ असे लिहण्यास परवानगी मिळावी अशी वादी यांनी विनंती केली आहे.

३. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल करुन असे कथन केले आहे की, प्रकरण निकालावर असून वादींना भरपूर संधी दिली असताना सदर दुरुस्ती केलेली नाही. सबब, अर्ज नामंजूर करण्यात यावा. याउलट अर्ज मंजूर करणेचे झालेस वादीकडून प्रतिवादींना रु. २०००/– कॉस्ट मिळावी अशी त्यांनी विनंती केली आहे.

४. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. वादींचा अर्ज, प्रतिवादींचे म्हणणे, अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले.

५. वादींनी प्रस्तुतचा दावा प्रतिवादींविरुध्द निरंतर ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. वादींचे असे कथन आहे की, सदरहू दाव्याचे कामकाज चालु असताना यातील वादी क्र. १ साऊबाई मच्छींद्र वाघमोडे ही दि. ०९/०२/२०१८ रोजी मयत झालेली आहे. यातील वादी

क्र. १ ही मयत झालेबाबत व तिचे दाव्याचेकामी वारस यापूर्वीच अभिलेखावर असल्याची पुरसीस मे. न्यायालयात दिलेली आहे. परंतु, दाव्याच्या सरनाम्यामध्ये वादी क्र. १ हिचे नावासमोर 'मयत' असे लिहण्याची परवानगी मागितली आहे.

**६.** वादींनी मागणी केलेल्या प्रस्तावित दुरुस्तीचे स्वरुप विचारात घेतले असता सदरची दुरुस्ती ही तांत्रीक स्वरुपाची असल्याचे दिसून येते. तसेच, प्रस्तावित दुरुस्ती अभिलेखावर आणल्यास दाव्याच्या आशयात व विषयात कसलाही बदल होत नाही. सदरची दुरुस्ती होणे कायद्याच्या दृष्टीने आवश्यक व गरजेचे आहे. त्यामुळे त्याला अनुषंगून वादींनी मागितलेली मागणी मंजूर केल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. दाव्याचा निकाल गुणदोषावर लागणेकरीता वादींनी मागणी केलेली दुरुस्ती करणे आवश्यक आहे. ही सर्व परिस्थीती पहाता अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. त्यामुळे भविष्यातील गुंता टाळण्यासाठी सदरची दुरुस्ती करण्यास परवानगी देणे न्यायोचित होईल. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो –

## आदेश

१. वादींचा अर्ज (नि.क्र.५५) मंजूर करण्यात येतो.

२. सदर आदेशाच्या दिनांकापासून वादी यांनी अर्जामध्ये मागितलेली दुरुस्ती करुन, दुरुस्त प्रत १४ दिवसांचे आत हजर करावी.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

PRACHI RAVINDRA KULKARNI
Digitally signed by PRACHI RAVINDRA KULKARNI
Date: 2026.07.13 17:52:08 +0530

**(श्रीमती पी. आर. कुलकर्णी)**

दि. १३/०७/२०२६. सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, सांगोला

## <u>प्रमाणपत्र</u>

मी खात्री देतो की, सदर आदेशाच्या/न्यायनिर्णयाच्या पीडीएफ फाईलमधील मजकूर हा मूळ आदेश/न्यायनिर्णयाप्रमाणेच शब्दशः आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : | वि. अ. डांगे |
| न्यायालय | : | सह दिवाणी न्यायालय, क.स्तर, सांगोला. |
| आदेश / न्यायनिर्णयाचा दिनांक | : | १३/०७/२०२६ |
| पिठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केलेली दिनांक | : | १३/०७/२०२६ |
| निकाल अपलोड केलेले दिनांक | : | १३/०७/२०२६ |